आवेदन क्रमांक :


# Government Polytechnic, Jalna

Nagewadi, Jalna Aurangabad Road, Jalna 431203.

Ph. No.(02482) 282 929, 282 323 Fax : (02482)220 604


दिनांक :

## मेस सेवा पुरविण्यासाठी निविदा सूचना

शासकीय तंत्रनिकेतन, जालना संस्था परिसरामधील मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना मेस सेवा पुरविण्या करीता केटरर्स यांचे कडून दोन लिफाफ्यात सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १. | मुलांचे वसतिगृह प्रवेश क्षमता | १८० मुले |
| २. | मुलींचे वसतिगृह प्रवेश क्षमता | ९६ मुली |
| ३. | निविदा फॉर्मची किंमत | रु. १५००/- ना परतीची रक्कम |
| ४. | बयाणा रक्कम रुपये | रु. २५,०००/- (पंचवीस हजार रुपये मात्र) परतीची रक्कम |
| ५. | निविदा फॉर्मची किंमत अदा करणे | रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| ६. | बयाणा रक्कमेची डीडी काढणे | राष्ट्रीयकृत बँकेचा डीडी नावे<br>प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना Payable at जालना |
| ७. | निविदा फॉर्म उपलब्ध होण्याचे स्थळ | मुलांचे वसतिगृह कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| ८. | निविदा उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक१२/०२/२०२०ते दिनांक २०/०२/२०२० दु.२.००पर्यंत सुटीचे दिवस वगळून |
| ९. | निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख | दिनांक२४/०२/२०२० संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत सुटीचे दिवस वगळून. |
| १० | सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांचा तपशिल निविदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती निविदेसोबतच सादर करण्यात यावे. | |
| ११ | निविदा उघडण्याची तारीख दि. २६/०२/२०२० स. ११.३० वा. | |

१. निविदा संस्थेच्या कार्यालयात आवक/जावक विभागात कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफ्यात जमा करावे.

२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांनी निविदा स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहे.

३. निविदेमध्ये भरलेले दर शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी लागू राहील व दर हे संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी अंतिम राहतील.

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, जालना

PRINCIPAL
Government Polytechnic
JALNA

आवेदन क्रमांक :

<u>निविदेच्या अटी व शर्ती</u>

१. मेस सेवा पुरविणेसाठी दोन लिफाफ्यात सीलबंद निविदा भरावयाची आहे.

२. निविदा फी रु. १५००/- रोखीने रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांचेकडे भरण्यात यावे.

३. Earnest Money Deposit (EMD)/ बयाणा रक्कम रु. २५,००० (पंचवीस हजारमात्र) नॅशनलाइज बँकेचा डी.डी.PRINCIPAL, GOVERNMENT POLYTECHNIC, JALNA PAYABLE AT JALNAयांचे नावाने काढून ओरीजनल डी.डी. निविदेसोबत सादर करावे.

४. निविदेसोबत तांत्रिक लिफाफ्यात फक्त कागदपत्रांचीछायांकित प्रती सादर करावयाची आहे. Technical Bid तांत्रिक लिफाफ्यात मागणी केलेले ओरीजनल कागदपत्रे निविदा उघडण्याची दिवशी निविदाधारकाने सोबत ठेवावे, निविदा उघडण्याचे वेळी ओरीजनल कागदपत्रे सादर न केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

५. Technical BidवCommercial Bidउघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदाधारकांनी यासाठी शासकीय तंत्रनिकेतन, जालना येथील कार्यालयात उपस्थित राहावे.

६. अपूर्ण निविदा विचारात घेतली जाणार नाही.

७. निविदा फी व बयाणा रक्कम भरल्याशिवाय सादर केलेलेनिविदा ग्राह्य धरले जाणार नाही.

८. अति आवश्यक सुचविलेले प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफ्यात सादर करण्यात यावे.

९. Technical Bid चे प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का असावा.

१०. Commercial Bid/Financial Bid लिफाफ्यातीलदरपत्रकात दर विद्यार्थ्यांसाठी मेसचार्जेसचे मासिक दरामध्ये
अ) विद्यार्थ्यांचे दोन वेळेचे जेवण नास्टासहीत नमुद करावे
ब) विद्यार्थिनींचे दोन वेळेचे जेवण नास्टासहीत नमुद करावे
क) गेस्ट चार्ज एका वेळेसच्या जेवणासाठी गृहीत धरुन नमुद करावे
प्रात्र निविदांपैकी सरासरी दराचा विचार निविदेचे दर तुलनात्मक तक्ता तयार करताना विचार केला जाईल व कमी दर असलेले निविदा १,२ व ३ ची म्हणून निवड केली जाईल.

११. दरपत्रकातील दर विद्यार्थ्यांना उत्तम गुणवत्तेचे जेवण मिळेल यादृष्टीने प्रचलित बाजारभावाचा विचार करून नमूद करावे. अत्यंत कमी अथवा जास्त दर असल्यास निविदा नाकारण्याचे अधिकार निविदा छाननी/पडताळणी समितीस असेल.

१२. मेस समिती व गुणवत्ता समिती मार्फत ठरविलेले अंदाजित अपेक्षित दर खालील प्रमाणे आहेत.
अ) विद्यार्थ्यांचे दोन वेळेचे जेवण नास्टासहीत नमूद करावे रु. २०००/-
ब) विद्यार्थिनींचे दोन वेळेचे जेवण नास्टासहीत नमूद करावे रु. १७००/-
क) गेस्ट चार्ज एका वेळेसच्या जेवणासाठी गृहीत धरुन नमूद करावे. रु.४०/-

१३. दरपत्रकातील दर संस्थेच्या वसतिगृहात उपलब्ध फर्निचर व साधनसामुग्रीची प्रत्यक्ष पाहणी करूनच नमूद करावे.

१४. पात्र निविदाधारकास संस्थेतील उपलब्ध फर्निचर व साधनसामुग्री पुरविली जाणार असल्याने एक लाख रुपयाची बँक गॅरंटी प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांचे नावे काढुन संस्थेत जमा करावे.

१५. नाश्ताचे मेनू व जेवणातील भाजी आठवडाभरात वेगवेगळा असावा याचा विचार करून दरपत्रकातील दर नमूद करावे. नाश्ताचे व जेवणातील पदार्थाची संभावांत यादी दरपत्रकासोबत जोडावी. यादीतील पदार्थ आठवडाभरात वेगवगळा दिला जाईल असे प्रमाणपत्र सादर करावे.

१६. निविदाधारकास दरमहा विदयार्थ्यांनी घेतलेल्या नाश्ता व जेवणाचे बील उपस्थिती अहवालानुसार वसतीगृह कुलमंत्री यांचे कडे सादर करावे लागेल व वसतीगृह कुलमंत्री यांनी पारीत केलेल्या देयकाची रक्कम संस्थेमार्फत कंत्राटदारास अदा करण्यात येईल.

१७. दरपत्राकातील दर नमुद करताना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून प्राप्त वार्षीक ॲकेडमीक कॅलेंडरनुसार मेससेवा पुरवावी लागेल. यासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०च्या ॲकेडमीक कॅलेंडरचा नमुना निविदाधारकाने अभ्यासावा.

**आवेदन क्रमांक :** ०३

१८. भोजनगृहात लागणारे धान्य व तेल खालील दर्जाचे असणे बंधनकारक राहील.

गहू –एमपीबोट(सरबती) / पेशी / २४७

तांदूळ – एचएमटी / कोलम

दाल - अनपॉलीशड (तुर)

तेल – चांगल्या ब्रँडचे सनफ्लावर/सोयाबीन तेल (ऐगमार्क)

वरील धान्य व तेलाचा किमान १५ दिवसाचा साठा करून ठेवावा लागेल. खरेदी साठा केलेल्या धान्याचे बीले जेवणाची गुणवत्ता तपासणी समितीकडे सादर करावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत तयार पीठ वापरता येणार नाही.

१९. मेसमधील खानावळीची गुणवत्ता व जेवणाच्या मेनुची तफावत नुसार देयक पारीत करतांना आवश्यकता असल्यास ५ ते १० टेक्कपर्यंत देयक वजा करण्याचे अधिकार कुलमंत्री यांच्याकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

२०. जेवण तयार करण्यासाठी व विदयार्थ्यांना पिण्याच्या शुध्द पाण्याचीसोय करण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.

२१. निविदेतील दरात साम्य असल्यास त्याबाबत अंतिम निर्णय प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना हे राहील.

२२. निविदाधारकाची कसलीही अट व शर्त मान्य करण्यात येणार नाही.

२३. कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचे किवा रद्द करण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना याचेकडे राखुन ठेवले आहेत.

२४. मेस मध्ये कार्यरत सर्व कर्मचारी हे वैदयकीय दुष्टीने सुदृढ असने आवश्यक आहे.

Principal
Government Polytechnic
JALNA

आवेदन क्रगांक :

खालील तपशिलाप्रमाणे कागदपत्रांची छायांकित प्रत तांत्रिक लिफाफ्यात सीलबंद करून सादर करावेत.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | जोडले असल्यास √मार्क करावे |
|---|---|---|
| ०१ | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ च्या अंतर्गत नोंदणी असल्याचा दाखला/ प्रमाणपत्र किंवा उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र/ नगरपरिषद यांचेकडील मेस चालविण्याच नोंदणी प्रमाणपत्र | |
| ०२ | अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र | |
| ०३ | शासकीय संस्था/बँक/शाळा/कंपनी येथे मागील ३ वर्षापासून सलग केटरिंग व्यवसाय किंवा समव्यवसाय करत असल्याचे ३ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र | |
| ०४ | निविदा फी भरल्याची पावती | |
| ०५ | बयाणा रकमेचा डीडी | |
| ०७ | बँकेकडील किमान रु. १० लक्ष रुपयाचे साल्व्हन्सी प्रमाणपत्र | |
| ०८ | पॅन कार्डची सत्यप्रत | |
| ०९ | आधार कार्डची सत्यप्रत | |
| १० | सध्या काम करत असलेल्या कामाविषयीचे कार्यदेशाच्या सत्यप्रती | |
| ११ | निविदाधारकाची माहिती | |

Principal
Government Polytechnic
JALNA